| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १०३ वा | शनिवार, दिनांक ११ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## दूध भेसळ, औषधांनंतर तुकाराम मुंढेचे पुढचे टार्गेट ठरले...

**मुंबई/प्रतिनिधी: अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे हे सध्या चर्चेत आहेत. तुकाराम मुंढे यांनी या विभागाचा कारभार हाती घेताच अन्न पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांना घाम फोडला आहे. दूध भेसळीविरोधात मुंडे यांनी मोठी मोहिम उघडली होती. त्यानंतर तुकाराम मुंडेंच्या रडारवर आता शाळा आहेत. अलीकडेच मुख्याध्यापक, बचत गट, शिक्षणाधिकाऱ्यांसोबत एफडीएची बैठक पार पडली.**




मध्यान्ह भोजन व शाळांमधील उपाहारगृहांच्या तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासन सरसावले आहे. आता मुंबईतील खासगी शाळांमधील उपाहारगृहे तसेच मध्यान्ह भोजन पुरविणारे किचन शेड यांच्यावर एफडीएची करडी नजर असणार आहे. यासंदर्भात मुंबईत विविध ठिकाणी शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक आणि बचत गट चालकांसोबत शुक्रवारी एक महत्त्वाची बैठक पार पडली.

अन्न सुरक्षा मानके अधिनियम २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने ही गतिमान कार्यवाही सुरू केली आहे. शालेय स्तरावर अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांना सकस व संतुलित आहार मिळणे अत्यंत आवश्यक आहे. याचे पालन संबंधितांनी केले नाही, तर कठोर कारवाई करण्याचा इशारा या बैठकीत अन्न औषध प्रशासन विभागाचे साहाय्यक आयुक्त पी. आर. सिंगरवाड यांनी दिला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतही मोहीम सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

### स्टिंगवर बंदी

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्टिंग आणि इतर एनर्जी ड्रिंक्सच्या बाटल्यांवर 'एनर्जी ड्रिंक' असा शब्द न लिहिण्याबाबत कंपन्यांना कडक निर्देश दिले आहेत. तसेच, लहान मुलांच्या आरोग्याची काळजी घेत, राज्यातील शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंगच्या विक्रीवर बंदी घालण्याचा मोठा निर्णय विधानसभेत जाहीर करण्यात आला आहे.

### एफडीएचे राज्यभरात १८ ठिकाणी छापे

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गुरुवारी राज्यभर राबविलेल्या 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या विशेष मोहिमेत एका दिवसात १८ छापे टाकत दूध व दुग्धजन्य पदार्थ, प्रतिबंधित गुटखा पानमसाला, मसाले, खाद्यतेल आणि बेकरी पदार्थ यांच्यावर कारवाई केली. याशिवाय ५८ हॉटेल, रेस्टॉरंट आणि ढाब्यांची तपासणी करून २६ सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या, तर चार आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले. मुंबईतील घाटकोपरमधील गौतम दुग्धालय येथे बासुंदी, कच्चे दूध आणि आइस्क्रीम असा ५३० किलो/लिटरचा ७९,१२० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. लेबलिंग नियमांचे उल्लंघन, अस्वच्छ साठवणूक आणि आवश्यक शीतसाखळी न राखल्यामुळे या आस्थापनेचा परवाना निलंबित करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यातील सिद्धेश्वर मिल्क प्रोडक्ट्स येथून ११८ लिटर, तर 'शिवामृत मिल्क अँड मिल्क प्रोडक्ट्स' येथून १,१४८ लिटर संशयित दूध जप्त करण्यात आले. जळगावमधील हेमराज डेअरी फार्म येथून २३८ लिटर भेसळयुक्त दूध जप्त करण्यात आले. लातूरमध्ये भेसळयुक्त दूध वाहतूक करणारे वाहन पकडून २३८ लिटर म्हशीचे दूध नष्ट करण्यात आले.

## विधान परिषदेचे ५ सदस्य निवृत्त

### हिवाळी अधिवेशनापूर्वी विरोधी बाकांवरील अनुभवी चेहरे बाहेर



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधान परिषदेतील ५ सदस्यांची ६ वर्षांची मुदत लवकरच संपुष्टात येत असल्याने, पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी त्यांना सभागृहाच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला. या पाचही सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत आहे. राज्य विधिमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर २०२६ रोजी नागपूर येथे होणार असल्याने, त्यांना या पावसाळी अधिवेशनातच निरोप देण्यात आला. निवृत्त होणाऱ्यांमध्ये बहुतांश सदस्य विरोधी पक्षांचे असल्याने वरिष्ठ सभागृहात विरोधकांचे संख्याबळ कमी होऊन त्यांचा आवाज काहीसा क्षीण होणार आहे. पावसाळी अधिवेशनात निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये सतीश चव्हाण व अरुण लाड (राष्ट्रवादी), अभिजित वंजारी व जयंत आसगावकर (काँग्रेस) आणि किरण सरनाईक (शिवसेना) यांचा समावेश आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून कार्याचा गौरव

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या लोकसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जनतेच्या हितासाठी या सदस्यांनी केलेले काम आणि सभागृहाची परंपरा जपण्याची त्यांची भूमिका कायम स्मरणात राहील, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. तसेच या सदस्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

### निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे सभागृहातील योगदान

सतीश चव्हाण (राष्ट्रवादी)अरुण लाड (राष्ट्रवादी)अभिजित वंजारी (काँग्रेस),जयंत आसगावकर (काँग्रेस),किरण सरनाईक (शिवसेना) निरोप समारंभाच्या शेवटी, निवृत्त होणाऱ्या या पाचही सदस्यांनी सभागृहातील आपल्या आठवणींना उजाळा देत आपल्या भावना व्यक्त केल्या.

## अपहरण झालेल्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा अवघ्या तीन दिवसांत शोध

### मुलगी सुखरूप पालकांच्या ताब्यात: चाकूर पोलिसांची तत्पर कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत चाकूर पोलिसांनी अपहरण झालेल्या १४ वर्षीय मुलीचा अवघ्या तीन दिवसांत शोध घेऊन तिला सुखरूप तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले आहे. विशेष म्हणजे, पीडित मुलीकडे कोणताही मोबाईल फोन उपलब्ध नसतानाही पोलिसांनी मानवी माहितीचा प्रभावी वापर करून ही यशस्वी कारवाई केली.

याबाबत पोलीस स्टेशन चाकूर येथे गु.र.नं. ३७३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १३७(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादीनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. ०४ जुलै २०२६ रोजी त्यांच्या १४ वर्षे ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशांवर पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ तपासाची सूत्रे हलविण्यात आली.तपासादरम्यान मुलीकडे मोबाईल फोन नसल्याने तपासास मोठे आव्हान निर्माण झाले होते. मात्र पोलिसांनी विविध ठिकाणी चौकशी, मानवी माहितीदारांचे जाळे,गोपनीय माहिती आणि सातत्यपूर्ण शोधमोहीम यांच्या आधारे मुलीचा माग काढला. अखेर दि. ०८ जुलै २०२६ रोजी मुलीचा शोध घेण्यात यश आले आणि तिला सुखरूप ताब्यात घेऊन आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तिच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले.या प्रकरणातील आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चामले करीत आहेत.

## दयानंद कला महाविद्यालयात 'मोफत आरोग्य' शिबिर संपन्न!

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालयात विद्यार्थी, प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी एका विशेष 'मोफत आरोग्य तपासणी व शरीर चरबी विश्लेषण' शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सद्यस्थितीतील धकाधकीच्या जीवनात आरोग्य सुदृढ राखणे अत्यंत आवश्यक असल्याने महाविद्यालयाच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला. सदर शिबिराचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या शिबिरात आधुनिक उपकरणांद्वारे सर्वांच्या शरीरातील चरबीचे प्रमाण, वजन, बी.एम.आय. आणि इतर महत्त्वपूर्ण घटकांची अचूक तपासणी करण्यात आली. प्रा. सतीश रसाळ आणि सुप्रसिद्ध वेलनेस कोच दत्तात्रय बुद्रुपे यांनी अत्यंत सुव्यवस्थितपणे सर्व उपस्थितांची आरोग्य तपासणी पूर्ण केली. या तपासणीनंतर वेलनेस कोचकडून प्रत्येकाला त्यांच्या शरीरप्रकृतीनुसार आहार आणि व्यायामाविषयी मोलाचे वैयक्तिक मार्गदर्शनही करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

या नाविन्यपूर्ण आणि आरोग्यदायी उपक्रमाबद्दल संपूर्ण महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने तसेच उपस्थित कर्मचाऱ्यांकडून प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे विशेष आभार मानण्यात आले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम, प्रा. अनिल भुरे, प्रा. सिद्धार्थ भालेराव, स्टाफ सचिव प्रा. सुरेश क्षीरसागरप्रा . दशरथ ननवरे आणि डॉ.सुधीर गाडवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### प्रभात किरणे

काल परवा तारुण्यात होते
उदया परवा म्हातारे होतील
का गर्व पद पैसा सुंदरतेचा
जाती कर्म सोडुन,सरणावरती

– इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८




## विवाहितेचा चार महिने छळ: तिघांविरुद्ध गुन्हा

**लातूर/प्रतिनिधी :** उदगीर : हॉटेल व्यवसाय सुरू करण्यासाठी माहेरहून एक लाख रुपये आणावेत, अशी मागणी करत विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू आणि दिराविरुद्ध उदगीर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित घटना पुणे जिल्ह्यातील कुरकुंभ येथे घडली असून, पीडित महिलेच्या तक्रारीवरून उदगीर येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उदगीर येथील पीडितेचा विवाह अजय महादेव कांबळे यांच्याशी झाला होता. विवाहानंतर सुरुवातीचे सहा महिने संसार सुरळीत सुरू होता. त्यानंतर पती आणि सासरच्या मंडळींकडून हॉटेल सुरू करण्यासाठी माहेरहून एक लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी करण्यात येत असल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

फिर्यादीने ही मागणी पूर्ण करण्यास असमर्थता दर्शवल्यानंतर २७ जून २०२५ ते २३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत तिला उपाशी ठेवणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे तसेच जीवे मारण्याची धमकी देऊन शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. हा प्रकार कुरकुंभ (ता. दौंड, जि. पुणे) येथे घडल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पती अजय महादेव कांबळे, सासू लक्ष्मीबाई महादेव कांबळे आणि दिर विजय महादेव कांबळे (सर्व रा. समाज मंदिर शेजारी, कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे) यांच्याविरुद्ध उदगीर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २८२/२०२६ नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ८५, ११५ (२), ३५२, ३५१(२) आणि ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार उस्तुर्गे करीत आहेत.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**१२% पेक्षा जास्त अल्कोहोल असलेल्या औषधांची खुली विक्री बंद...**

### चिमटा



दयाचा

लातूरात भेसळ रोखण्याची कारवाई थंडच आहे !
सुरवातीला दाखविलेली धमक मंदावली आहे!!
जनता म्हणते हा देखावा आहे!!!
भेसळयुक्त पदार्थ विकले जातच आहेत!!!!

## राष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त अभाविप लातूर महानगरतर्फे

## जनकल्याण निवासी विद्यालयात वृक्षारोपण

**लातूर/प्रतिनिधी:** राष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), लातूर महानगर यांच्या वतीने जनकल्याण निवासी विद्यालय, हरंगुळ येथे वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात पोहोचविणे, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि वृक्षसंवर्धनाची भावना दृढ करणे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



उपक्रमादरम्यान विद्यालय परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्ष हे पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे महत्त्वपूर्ण साधन असून वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

राष्ट्रीय विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संरक्षण आणि राष्ट्रहिताची जाणीव निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

यावेळी अभाविप लातूर महानगरचे सहमंत्री शुभम क्षीरसागर, एस.एफ.एस. संयोजक ऋत्विक मोरे, पूर्व नगरसहमंत्री प्रथमेश सुरवसे, सार्थक मटपती तसेच अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांना वृक्षलागवडीबरोबरच लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे नियमित संगोपन करण्याचे आवाहन केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय विषयांबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठीही सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, राष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त आयोजित हा वृक्षारोपण उपक्रम त्याच सामाजिक बांधिलकीचा एक भाग असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## ३०,७६५ किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त

### *एमआयडीसी पोलिसांची गुटखा विक्रेत्यावर कारवाई*

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या कारवाईअंतर्गत एमआयडीसी पोलिसांनी कारवाई करत एका विक्रेत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, ३०,७६५ किमतीचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित पान मसाला, तंबाखूजन्य पदार्थ व वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

याबाबत पोलीस स्टेशन एमआयडीसी, लातूर येथे गु.र.नं. ४४६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २७४, २७५, २२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ०९ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ७.०० वाजता महादेव नगर, खांडापूर, ता. जि. लातूर येथे छापा टाकला. या कारवाईत उमेश (वय ३४ वर्षे, रा. महादेव नगर, खांडापूर, ता. जि. लातूर) याच्या राहत्या घरात, नागेश पान शॉपमध्ये तसेच एमएच-२४-एसी-७६६३ क्रमांकाच्या अक्सेस दुचाकीच्या डिकीत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्री व वाहतुकीसाठी साठवून ठेवलेले आढळून आले.

कारवाईदरम्यान विमल पान मसाल्याचे २१ पुडे, 'तंबाखू' ब्रँडचे २६ पुडे, बाबा ब्लॅक तंबाखूचे डबे, बाबा सुपारीची पाकिटे तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी अक्सेस दुचाकी असा एकूण ३०,७६५ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पाटील हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक समाधान चव्हरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पाटील, पोलीस अमलदार बळवंत भोसले व साखरे यांनी पार पाडली.

